**नियमित दिवाणी दावा क्र.२८०/२०२२**

**निशाणी १२ खाली**

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ चा उलटतपास प्रतिवादी क्र.१ व ३ तर्फे वकील श्री.जे.एम.महामुनी यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

९. माझे लग्न किती तारखेला झाले हे मला सांगता येणार नाही. माझे सासर झरे येथे आहे. बयाबाई ईश्वरा डोंबाळे ही माझी आत्या आहे. हे म्हणणे खरे आहे की, ती पारेकरवाडी येथील आहे. हे म्हणणे खरे आहे की, तिला रंभाजी, तानाजी, बिरा, धुळा, सर्जेराव, गोविंदा अशी मुले आहेत.

१०. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१३९, १४० ही लक्ष्मणच्या वडीलांची जमीन आहे. माझ्या सरतपासात नमूद केल्याप्रमाणे माझ्या जबाबात ज्या वाडवडीलार्जित मिळकती आहेत त्या पारेकरवाडी येथील आहेत. मला याची माहिती नाही की, झरे येथील मिळकत लक्ष्मणची खरेदीची मिळकत आहे किंवा कसे.

प्रश्न – तुमच्या सरतपासाच्या कलम ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे दावा कलम १ मधील मिळकत एकत्र कुटुंबाची वाडवडीलार्जित व खरेदी मालकी असे नमूद करण्यात आलेले आहे तर कोणती मिळकत खरेदीची आहे.

उत्तर – मला सांगता येणार नाही.

प्रश्न – तसे तुमच्या सरतपासात व दाव्यात कोणत्या कागदाच्या आधारे लिहिलेले आहे.

उत्तर – मला त्याबाबत काही कळत नाही.

हे म्हणणे खरे नाही की, दाव्यातील माहिती माझ्या भावाने वकीलांना दिली. ती माहिती आम्हीच सांगितली. मी वकीलांना खरेदीचा कागद दाखवला नाही. आजोबापासून मिळकत आली याच्याबाबतचा मी कागद वकीलांना दाखवला नाही.

११. हे म्हणणे खरे आहे की, माझे लग्न वडीलांनी लावून दिले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या लग्नाला माझ्या वडीलांनी खर्च केला. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण बाहेर काम करत होते. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण गावात काम करत होते. माझे वडील मेंढरे राखायचे. हे म्हणणे खरे नाही की, आजोबाची शेती नसल्यामुळे वडीलांनी मेंढरे केली होती. मला याची माहिती नाही की, झरे येथील जमीन माझ्या वडीलांनी त्यांच्या पैशातून खरेदी केली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील गुजरातला अहमदाबादमध्ये माझ्या भावाकडे वारले.

१२. हे म्हणणे खरे नाही की, माझा आणि माझ्या पोरांचा सांभाळ कल्लाप्पाने केला. हे म्हणणे खरे आहे की, माझी आई माझ्या जवळ राहती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने माझ्या वडीलांना सांभाळले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि माझी पूर्वीपासून फाटकून राहत होतो. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमधील हक्क मी पूर्वीच चार माणसांदेखत सोडून दिला होता.

१३. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईने पोरांना त्रास दे असे सांगितल्यावरुन मी खोटा दावा दाखल केला आहे. दाव्याला कारण घडून वर्ष झाले. हे म्हणणे खरे आहे की, कल्लाप्पा हे पहिल्यापासून गुजरात येथेच राहतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे आणि माझे बोलणे भाषण नाही. हे म्हणणे खरे नाही की, कल्लाप्पाच्या खरेदी घेतलेल्या मिळकतीत मी राहते. हे म्हणणे खरे नाही की, दाव्याला कोणतेही कारण घडलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हक्क सोडलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, भावांना त्रास देण्यासाठी मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकूर खोटा आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

**<u>प्रतिवादी क्र.२ विरुध्द दावा एकतर्फा चालू असल्याने त्यांच्यामार्फत उलटतपास नाही.</u>**

**<u>प्रतिवादी क्र.४ यांनी उलटतपास नाकारला.</u>**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2023.10.30 16:59:59 +0530

आटपाडी
दिनांक : ३०/१०/२०२३
04:22:40 PM

(वि. द. पाटील)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
आटपाडी

*****